# ठाणे वनविभाग

## माळ (भांगवाडी) ता.मुरबाड,जि.ठाणे

## एक यशोगाथा

## प्रस्तावाना

माळ (भांगवाडी) हे गाव ठाणे जिल्हयातील मुरबाड तालुक्यातील अतिदुर्गम आदीवासी गाव असून मुरबाड या तालुक्याच्या ठिकाणापासुन ४० कि.मी अंतरावर असुन माळ (भांगवाडी) गावातील लोक अजुनही आपले पिढी जात शेती व्यवसाय करतात. त्यांचे शेतीव्यवसाय गावाचे जंगल अनेक प्रकारे हातभार लावते. त्यामुळे माळ (भांगवाडी) च्या गावक—यांनी राखीव व संरक्षित वन संयुक्त वन व्यवस्थापनाचे माध्यमातुन जंगल संरक्षणाचा वसा घेतलेले असुन अन्य गावांसाठी वनसंरक्षणाचा एक वस्तुपाठ घालून दिला आहे.

सहयाद्रीच्या कुशीत वसलेले माळ (भांगवाडी) हे गाव ठाणे जिल्यात अतिदुर्गम व डोंगरी भागात मोडत असुन हे गाव जिल्हयाच्या ठिकाणापासुन ८० कि.मी अंतरावर वसलेले असुन गांवाचे भौगोलीक क्षेत्र ५३६.०० हेक्टर असुन गांवाच्या सीमेत वनक्षेत्र ३७०.४७२ हेक्टर आहे. वनव्यवस्थापन समीती स्थापन होण्यापूर्वी वनक्षेत्र उघडे—बोडके अवनत होत चाललेले होते.त्यामुळे लोकांच्या गरजा,गुरांना चारा,सरपण,पाणी इ.समस्यांना गांवक—यांना तोंड दयावे लागत होते.सदरच्या गरजा भागविण्याकरीता लोकांना दुस—या गावाच्या वनक्षेत्रावर विसंबुन रहावे लागत असे. गांवात पाणी टंचाई प्रदुषण वाढत होते. याचा सारासार विचार करून माळ (भांगवाडी) गांवातील नागरीकांनी व महाराष्ट्र शासन वनविभाग यांच्यातर्फे वनक्षेत्रपाल टोकावडे उत्तर यांचे संयुक्त विद्यमाने शासन निर्णय क्रमांक १६ मार्च १९९२ व शासन निर्णय २००३ च्या निर्णयाची माहीती गावातील ग्रामस्थांना देवून गावातील ग्रामस्थांनी सदर शासन निर्णयाचे स्वागत करून वनसंपदेचे रक्षण करण्यासाठी वनकर्मचा—यांना सहकार्य करण्यास पुढाकार घेतला. माळ (भांगवाडी) गांवातील जेष्ठ नागरीक व इतर गांवकरी व गावातील ४६५ कुंटुबातील सदस्य एकत्रीत येवून स्थानिक वन अधिकारी यांचे सहकार्याने वनसंरक्षण समिती स्थापन करून गांवालगत असलेले ३७०.४७२ हेक्टर जंगलाचे संरक्षण सर्व ग्रामस्थांनी करावयाचे ठरविले. सन २००८ पासुन वनविभागाशी संपर्कात राहून वनाचे संरक्षण करण्याचे काम सुरू केले आहे. वेळोवेळी वनकर्मचारी व ग्रामस्थ मांडीला मांडी लावुन वनाचे संवर्धन व संगोपन करण्याचा विचार विनिमय करीत असतात. समिती गठीत झाल्यानंतर गावासाठी लागणारा चारा,सरपण हे जंगलाला इजा न पोहचता स्थानिक वन अधिका—याच्या मार्गदर्शनानुसार वाळून गळून पडलेले सरपण गोळा करून गरजा भागवत आहेत. सुरवातीच्या काळात व आजही जादा लागणारा चारा,सरपण इत्यादी गरजा त्यांचे खाजगी मालकी क्षेत्रातुन उपलब्ध होणा—या वनउपजावर भागवत आहेत.

वनसंरक्षण समितीच्या सदस्यांनी प्रथमत: स्वताहून जंगलाचे संरक्षण करून व बाहेरील लोकांना आपल्या जंगलात येण्याबाबत बंदी घातली. त्याचप्रमाणे इतर गावातील लोकांना जनजागृती द्वारे अवैध कृत्य करण्यापासुन परावृत्त केले आहे. संयुक्त वन व्यवस्थापन संस्था स्थापन झाल्यापासुन माळ (भांगवाडी) गावातील जंगलामध्ये एकही वनगुन्हा घडलेला नाही.याचा विचार करून सदर गावाची निवड सन २००८ मध्ये करण्यात आले व विकास वनविकास यंत्रणेतंर्गत करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव सादर करून. सुक्ष्म आराखडयास मंजुरी मिळालेली आहे.



मा.प्रधान सचिव वने मौजे माळ (भांगवाडी) गावाचे वनक्षेत्रात वनअधिकारी व ग्रामस्थांना

मार्गदर्शन शिबीर



प्रधान सचिव वने श्री.प्रविणसिंग परदेशी यांनी मौजे माळ भांगवाडी या संयुक्त वनव्यवस्थापन गावास प्रथम दि २६.३.२०१४ रोजी भेट दिली त्यावेळी ग्रामस्थांशी विकासाच्या विविध विषयांवर चर्चा कर न आढावा घेतला व गावक.यांना त्यांच्या अर्थिक उन्नतीसाठी अजून काय करता येईल याबाबत विचारणा केली त्यावेळी ग्रामस्थांनी सांगितले की, आता मोहा फुले गोळा करणेचा हंगाम आहे हि फुले आम्ही जंगलातील झाडाखाली वेचतो व ती वाळवून व्यापा.यास विकतो आम्हाला ९ ते १० प्रती किलो दर मिळतो पण हि फुले साठवून जर तिन चार महिन्यात विक्री केली तर रुपये २० प्रती किलो पेक्षा जास्त दर मिळेल त्यावर मा सचीव महोदयांनी सदरची फुले समितीने रुपये १० दराने विकत घ्यावीत असे सुचविले त्याप्रमाणे मोहा फुले विकत घेउन त्यांची साठवणूक करण्यांत आली आणि ४ महिन्यानंतर ती अधिक भाव झाल्यावर रुपये १७ प्रति किलो दराने विक्री करण्यांत आली अधिक भावाचे फरकाची रक्कम ग्रामस्थांना वाटण्यात आली अशाप्रकारे आता दरवर्षी मोहा फुले समिती मार्फत खरेदी केली जातात व जास्त दर मिळालेनंतर विक्री करन फरकाची रक्कम सभासदरांना अदा केली जाते व त्यांच्या अर्थिक उत्पन्नात वाढ करण्याचा प्रयत्न केला जातो

त्यानंतर मा परदेशी सरांनी दिनांक १५.५.२०१४ रोजी या भागात पुन्हा दौरा केला व या कामांचा आढावा घेतला त्यावेळी ग्रामस्थांनी वेगळी मागणी केली मोहाच्या झाडांना आता फळे लागली आहेत ग्रामस्थांच म्हणणे होते की, त्या मोहा फळामधील बियांचे गाळप करणेसाठी आम्हास खुप दूरवर तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या तेलघाणीमध्ये जावे लागते एकदिवसाचा रोजगार बुडतो, वेळ जातो, हैराणी होते व तेलाचा उतारा सुध्दा चांगला मिळत नाही तसेच पेंड परत मिळत नाही यावर उपाय म्हणजे या गावाला तेलबिया पासून तेल काढणारी तेलगिरण देणे हाच आहे मा सचिव महोदयांनी सुचना दिल्याप्रमाणे नागपूरहून ७,४२,०००/- रुपये किंमतीची तेल गिरणी मागविण्यांत आली व ती या आदिवासी पाडयांमध्ये स्थापित करण्यांत आली व आता या गावामध्ये गोळा होणा-या सर्व मोहा फुलांच्या बियांचे गाळप गावामध्येच होते व गावक यांना चांगला अर्थिक फायदा होत आहे

अशा प्रकारे गावाचा विकास होत चालला आहे त्याची महती मा राज्यपाल मोहदयांपर्यंत पोहोचली व ते दिनांक ३.३.२०१५रोजी या उपक्रमांची पहाणी करणेसाठी आले त्यांनी ग्रामस्थांचे व वनरक्षकांचे अभिनंदन केले त्यानंतर गावामध्ये अधुनमधुन विदयुत पुरवठा खंडीत होतो म्हणून पॉवर जनरेटर पाहिजे अशी ग्रामस्थांनी मागणी केली मा जिल्हाधिकारी ठाणे यांनी वैधानिक विकास मंडळाचे अनुदानातून निधी उपलब्ध कर न दिला व हि मशीन चालिवणेसाठी रु. ७७२०४९/- चा डिझेल जनरेटर या ठिकाणी बसविण्यांत आला आहे दिवसेंदिवस होणारी प्रगती ऐकुन मा सचिव आदिवासी विभाग यांनी सुध्दा या गावास भेट दिली आणि या ठिकाणी एक पिठाची चक्की आणि मसाला कांडण यंत्र बसले गेले

अशाप्रकारे माळभांगवाडी स्वयंपुर्ततेकडे वाटचाल करीत आहे गेल्या महिन्यात वनाधिका-यांनी या गावास पुन्हा भेट दिली अजुन काय करता येईल यावर विचार विनिमय झाला गावामध्ये खुप मोठया प्रमाणात बांबु आहे खाजगी शेतक-याच्या शेतबांधावर त्यापासून ऑगस्ट , सप्टेंबर मध्ये बांबु टोपल्या सुपे पाटया बनविल्या जातात व त्या बाजारांचे ठिकाणी विकल्या जातात हा उत्पादीत माल समितीनेच गावातच खरेदी करावा व नंतर व्यापा-यांना गावात बोलावून तो उघड लिलाव पध्दतीने विकावा असे सर्वानुमते ठरले आहे व ग्राम वनसंरक्षण समिती आणि वनविभाग हा प्रयोग सुध्दा यशस्वी करुन दाखविणार आहे

## ग्रामस्थांचा सहभाग

संस्था स्थापन झाल्यापासुन आजपावेतो माळ (भांगवाडी) वनसंरक्षण समितीच्या सर्व सभासदांनी हिरीरीने वनाचे सरंक्षण करून वेळोवेळी वनअधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ यांनी एकत्रीत गावामध्ये सभा घेवून वनाचे संवर्धन व संगोपन करण्याबाबतचा विचार विनिमय करत असतात.

त्यानुसार सर्वाच्या सहकार्याने गावाचा विकास होत आहे.माळ (भांगवाडी) गावात शेत जमिनधारक शेतक–यांनी आपआपल्या स्वत:च्या निकृष्ट वरकस जमिनीवर मोठया प्रमाणात चिंच, आंबा, बांबू, काजु व इतर औषधी वनस्पतीची लागवड केलेली असुन, त्यापासुन उत्पादनही सुरू झालेले आहे. तसेच काजु, आंबा,चिकु सारखी फळ झाडे कृषी विभागाकडील योजनांमधुन लागवड केलेली आहे.

**मा.प्रधानसचिव वने व मुख्यवनसंरक्षक ठाणे,उपवनसंरक्षक ठाणे व अधिकारी कर्मचारी यांची मार्गदर्शनपर भेट व दौराः–**



## ग्रामस्थांच्या सहभागाने राबवलेले उपक्रम व जनजागृती

१. ग्राम स्वच्छता
२. शैक्षणिक दर्जा वाढ
३. रस्ते साफसफाई, दुरूस्ती
४. गटार बांधणी
५. पंच तत्वाची जागृती
  अ. चराई बंदी
  ब. कु–हाड बंदी
  क. नशाबंदी
  ड. नसबंदी
  इ. श्रमदान

याचे मुख्य कारण म्हणजे गावात संयुक्त वन व्यवस्थापन समिती स्थापन करून ग्रामस्थामध्ये जन–जागृती केल्यामुळेच गावाचा विकास होत आहे.



## जल व मृदसंधारण कामे

मौजे माळ (भांगवाडी) गावाचे शासकिय वनांत वनविभागामार्फत जल व मृदसंधारण कामे घेताना भुव्यवस्थापन करणारे इतर शासकिय यंत्रणा यांचा सहभाग घेवून स्थानिक लोकांना पाणलोट विकासाचे महत्व व त्या अनुषंगाने होणारे फायदे यांची माहिती पटवून देवून डोंगर माथ्यापासुन ते पायथ्यापर्यत जल व मृदसंधारणाची कामे वन पर्यटन योजना व इतर योजना घेण्यात आलेली आहेत. त्यामुळे पाणवहाळ क्षेत्राचा विकास झाला आहे.तसेच वनक्षेत्रात नैसर्गिक व कृत्रिम पुननिर्मिती करण्यात आलेली आहे.त्यामुळे वनालगत असलेल्या लोकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे.तसेच जल व मृदसंधारण अंतर्गत वनविभागामार्फत जलसंधारण योजने अंर्तगत वनबंधारे तसेच घळ नियंत्रक बांध व स्थानिक स्थर वनविभाग ठाणे अंतर्गत ३ सिमेंट बंधारे बांधण्यात आलेले आहेत.









मौजे माळ (भांगवाडी) गावांत इतर विभागाच्या व ग्रामपंचायत माळ यांचे सहकार्याने इतर विभागाकडुन गावांत खालील प्रमाणे विकास कामे करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र | कामाचे नांव | योजना |
|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत कार्यालय माळ | जिल्हा परीषद |
| २ | अंगणवाडी | जिल्हा परीषद |
| ३ | अंतर्गत रस्ता कॉक्रीटीकरण | ---,,--- |
| ४ | नवीन शाळागृह बांधणे | ---,,--- |
| ५ | बसस्थानक | महाराष्ट्र शासन |
| ६ | पोस्ट ऑफीस | भारत सरकार |
| ७ | आदिवासी आश्रमशाळा | महाराष्ट्र शासन |
| ८ | एन.पी.जी गॅस कनेक्शन | वनविभाग |

वनविभागामार्फत L.P.G. कुकिंग गॅस वितरणः—





माळ (भांगवाडी) गावाचे ग्रामस्थ देखील जंगलात गस्ती करून वनसंरक्षण करत असतात.यावरून जंगलावर,वृक्षावर,निसर्गावर प्रेम आहे.याची खात्री वाटत आहे. तसेच शाळकरी,मुले,महिला,अबालवृद्ध या सा—यांचा उत्साह सहभाग पाहून जंगल संरक्षण अतिशय चांगले असुन,रोपवन ही उत्तम आहे.तसेच जल व मृदसंधारण कामे देखील चांगली आहेत.माळ (भांगवाडी) ग्रामस्थांनी गांवाच्या शिवारात वणवा लागु दिलेला नसल्याने करवंदे इत्यादी फळे रानभाज्याचे उत्पादनात वाढ होउन अनेक ग्रामस्थ माळशेज रस्त्यावर करवंदे, आंबे, आवळा, जांभळे, टेंबुरूणा, रानभाज्या, विकत असुन रोजगार निर्माण झाला आहे.दरवर्षी वनवा लागुन फळे, फुले, रानभाज्याचे उत्पादन अतिशय कमी होत होते.परंतु जंगलाला वणवा लागु न दिल्याने फळे, फुले, रानभाज्याचे उत्पादन वाढल्याने ग्रामस्थ हिरीरीने वसंवर्धन संरक्षणात भाग घेत असतात.





तसेच रानमेवा विक्री केंद्रावर रानफळे,रानभाज्या विकून रोजगार मिळवतात. काही ग्रामस्थ वनौधीचा वापर करून आजारावर उपचार करत असतात त्यामुळे काही सदस्यांना रोजगार मिळतो.

संयुक्त वन व्यवस्थापन समिती माळ (भांगवाडी) या गावात वनविभाग ठाणे यांचे कडून मध उत्पादन व लाख उत्पादनाचा प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबविला असुन पुढे ग्रामस्थांनी मध उत्पादन व लाख उत्पादन करण्याचा मनोदय असून त्यासाठी काही तरूण प्रशिक्षण घेण्यास उत्सुक आहेत.







मा.राज्यपाल,महाराष्ट्र राज्य,यांचा मूरबाड दौरा दि.०३/०३/२०१५
मा.राज्यपाल सी.वी.राव यांनी माळ भांगवाडी गावास दिलेली भेट






ग्रामस्थांसाठी डिसेल जनरेटर



माळ भांगवाडी गावाची पाहणी करताना मा.राज्यपाल



मोह तेल गाळप यंत्राची माहिती देताना मा.सहा.वनसंरक्षक मुरबाड



मोहा बिया फोडताना



मा.उपवनसंरक्षक ठाणे वनविभाग ठाणे हे तेल गाळप यंत्राची व मोह बियांची माहिती देताना



गावक—यांनी मांडलेल्या गौण वनोपजाची पाहणी करताना:—



**मोहा बिया सुकवताना**





मा.राज्यपाल यांना बांबूपासून बनवलेल्या टोपलीची भेट देताना:—

मा.पालकमंत्री ठाणे यांच्या हस्ते शासकीय धनादेश वितरीत करताना:—



मा.राज्यपाल आपले मनोगत व्यक्त करताना:—



मा.राज्यपाल यांच्या भाषणाच्या वेळी उपस्थित जनसमूदाय:—



**संयुक्त वनव्यवस्थापन समिती माळ भागंवाडी अंतर्गत माहिती**

- संयुक्त वनव्यवस्थापन समिती भांगवाडी सन.२०१३–१४ व २०१४–१५ मध्ये गौण वनोपज मोहफुले ४३०० किलो समितीमार्फत गोळा करुन साठवण करुन रक्कम रु.६४५००/– ची विक्री करुन मजूरी पोटी ५५९००/– खर्च वजा जाता ८६०० रु.समितीला नफा झाला आहे.
- संयुक्त वनव्यवस्थापन समिती भांगवाडी येथे २०१४–१५ मध्ये मोह बियांपासून तेल गाळप करणा–या यंत्राची खरेदी ७७२०४९/– रु.अनूदान वनविभागाकडून प्राप्त झाले असून भांगवाडी येथे गाळप यंत्र बसविले आहे. सदर यंत्राचा देखभाल खर्च व चालवण्याचा खर्च समिती सदस्यामार्फत होत असून सन. २०१४–१५ मध्ये मोह बियांचा गाळप करुन निर्माण झालेले ४५० किलो खादय तेल ग्रामस्थांना वाटप करण्यात आले असून बियांपासून निर्माण झालेली पेंड ४५० किलो बाजारात विकून समितीला ५४००/– रु.नफा झाला आहे.

धन्यवाद...